ePaper

# शरद पवार यांच्या प्रकृती अस्वस्थ;आजचे सर्व कार्यक्रम रद्द



|| वर्ष - 7 | अंक - 315 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 6 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- कोलकाताचा लखनऊवर मोठा विजय
- आलियाच्या लेकीचा गोड अंदाज
- टेप रेकॉर्डरसारखे काम करू नका!
- पवार प्रश्न सोडवू शकले नाहीत


## हाय होल्टेज बारामती लोकसभेसाठी उद्या मतदान

# प्रचारतोफा थंडावल्या!

### बारामतीत प्रचार सांगतेचा ‘सुपर संडे’; प्रशासन सज्ज, 11 तास मतदान होणार

| पुणे | महाईन्यूज

**बारामती लोकसभेच्या मंगळवारी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान केंद्रावर येऊन मतदान करणाऱ्या ८५ वर्षांपुढील मतदारांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात येणार आहे. मतांचा टक्का वाढविण्यासाठी जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**



निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मतदान यंत्रांची सरमिसळ करण्यात आली असून, ७५ टक्के मतदान यंत्रांचे वाटप पूर्ण करण्यात आले आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघनिहाय महिला, दिव्यांग, युवा, वैशिष्ट्यपूर्ण (युनिक) आणि आदर्श अशा मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आल्याची माहिती बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी पत्रकार परिषदेत दिली. बारामती मतदारसंघासाठी मंगळवारी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेदरम्यान मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणुकीच्या अनुषंगाने साहित्याचे आज, सोमवारी सकाळी वितरण होणार आहे.

### नाक्यावर पोलिस बंदोबस्त

बारामतीसाठीचा प्रचार रविवारी सायंकाळी सहा वाजता संपला. त्यानंतर कोणताही अनुचित प्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी शहराच्या बाहेर नाक्यांवर बंदोबस्त ठेवण्यात आला आहे; तसेच पैसे, दारूचे वाटप होणार नाही यावर लक्ष ठेवण्यात आले आहे. मंगल कार्यालयांसह हॉटेलमध्ये होणाऱ्या पार्ट्यांवरही लक्ष ठेवण्याच्या सूचना निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मतदारसंघातून १८ लाखांची रक्कम आणि सुमारे ९७ लाख रुपयांची दारू जप्त करण्यात आली आहे.

### मतदान केंद्रातील सुविधा

- गर्भवती, वृद्धांसाठी मतदान केंद्रावर प्रथमच प्रतीक्षालय
- मतदारांना उन्हाचा फटका बसल्यास ‘ओआरएस पॅकेट्स’
- शौचालये, पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दिव्यांगासाठी रॅम्पची सुविधा

### मतदान केंद्रांवर मंडप

**यंदा उन्हाळा खूप जास्त आहे. त्याची तीव्रता लक्षात घेता आणि मतांचा टक्का वाढावा यासाठी बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांवर मंडप टाकण्यात आले आहेत. पाच किंवा त्यापेक्षा जास्त मतदान केंद्रे असणाऱ्या मतदान केंद्रांवर हे मंडप उभारण्यात आले आहेत. खडकवासला मतदारसंघात सर्वाधिक पाच किंवा त्यापेक्षा अधिक अशी मतदान केंद्रे आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघात २५१६ मतदान केंद्रे असून, त्यापैकी १३५ केंद्रांवर मंडप टाकले असल्याची माहिती कविता द्विवेदी यांनी दिली.**

### रोहित पवार यांची मिमिक्री

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणामध्ये रोहित पवार यांच्या शरद पवारांच्या सभेतील रडण्याचा संदर्भ घेतला आणि रोहित पवार हे नाटक करत असल्याची टीका केली. त्यांनी रोहित पवारांची नक्कल करत डोळ्याने रुमाल पुसत असल्याचा अभिनय केला. अशी नाटकं करण्यापेक्षा तुम्ही तुमचे काम दाखवा.**

**तुमचं नाणं खणखणीत वाजलं तर तुमच्या रडायची वेळ येणार नाही. हा तर केवळ रडीचा डाव झाला, मी आधीपासून सांगत होतो की, काही जण भावनिक करणार. आलं ना लक्षात? हे असलं चालत नाही बाबांनो.. असे म्हणत अजित पवारांनी रोहित पवार यांच्यावर टीका केली.**

### बायको संसदेत गेल्यावर नवरा पर्स सांभाळणार का?

अशा आशयची टीका काहींनी माझ्यावर केली. अजित पवार काय पर्स सांभाळणारा वाटतो का रे...? असे उपस्थितांना विचारत सदानंद सुळे काय पर्स सांभाळतात का? अशी विचारणा करीत अजित पवार यांनी सुप्रिया सुळेंवर पलटवार केला.

### तू संसदेत जाताना सदानंद सुळे पर्स घेऊन जातात का?

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बारामतीच्या प्रचाराची सांगता करताना आज आमदार रोहित पवार आणि सुप्रिया सुळे यांना चांगलेच लक्ष्य केले. शरद पवार यांच्या सांगता सभेमध्ये रोहित पवार यांचे भाषण झालं होतं. या भाषणादरम्यान रोहित पवार हे भावनिक झाले. त्याची नक्कल अजित पवारांनी त्यांच्या सभेत केली. तसेच पर्सवरून केलेल्या सुप्रिया सुळे यांच्या टीकेलाही अजित पवार यांनी उत्तर दिले.

### दोन्ही पवारांच्या आज स्वतंत्र सभा, कोण काय बोलणार?

शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी आतापर्यंत शरद पवार, शिवसेनेचे उद्धव ठाकरे, कॉँग्रेसचे नेते राहुल गांधी, जयंत पाटील, संजय राऊत, आदित्य ठाकरे, राजेश टोपे, भास्कर जाधव, रोहित पवार, रोहित पाटील या नेत्यांनी सभा घेतल्या. सुनेत्रा पवार यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, हर्षवर्धन पाटील, धनंजय मुंडे, रामदास आठवले, दत्तात्रय भरणे, महादेव जानकर, बाबा सिद्दिकी, चित्रा वाघ आदींनी सभा घेतल्या आहेत.

### मी म्हणतो जाऊ द्या, जाऊ द्या

ते म्हणाले, महिला लोकसभेत गेल्यानंतर त्यांचा नवरा पर्स घेऊन जातो का? मला तर एकेकाला अशी उत्तर देता येईल की, पळता भुई थोडी होईल. मध्ये कुठे च थांबणार नाहीत, थेट मुंबई गाठतील... मी म्हणतो आपलीच भावंडे आहेत, जाऊ द्या, बहीण आहे जाऊ द्या, पण हे जरा जास्तच व्हायला लागलंय. हे चालणार नाही, असा इशाराच अजित पवार यांनी दिला.

# बारामतीच झालं आता शिरूरला जायचं!

## अजित पवारांनी वाढवलं अमोल कोल्हेंच टेन्शन? नेमकं काय म्हणाले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघासाठी ७ तारखेला मतदान पार पडणार असून प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. इतिहासात पहिल्यांदाच येथे जेष्ठ नेते शरद पवार विरुद्ध उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामध्ये सामना रंगला आहे.**



महाविकास आघाडी कडून सुप्रिया सुळे तर महायुतीकडून सुनिता पवार या मैदानात आहेत. आज बारामती मध्ये पार पडलेल्या प्रचार सांगता सभेला दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी तुफान गर्दी केल्याचा पाहायला मिळाल. सुरेंद्र पवार यांच्यासाठी आयोजित सभेत बोलताना अजित पवार यांनी आता बारामतीचं मतदान पार पडल्यानंतर शिरूर मध्ये सर्वांनी जायचंय, असं आवाहन कार्यकर्त्यांना केलं आहे. त्यामुळे आता अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नेते शिरूर लोकसभा मतदारसंघात सक्रिय होणार असल्याच स्पष्ट झालं आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्यामध्ये लढत होत आहे. येथे महाविकास आघाडी कडून अमोल कोल्हे तर महायुतीकडून शिवाजीराव आढळराव पाटील हे मैदानात आहेत. कोल्हे यांचा पराभव करण्यासाठी अजित पवार यांनी आढळराव पाटील यांच्या रूपाने तगडा उमेदवार येथून मैदानात उतरवायला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात जास्त लक्ष केंद्रित केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुतांश नेते इकडेच दिसून आले. मात्र आता अजित पवारांनी शिरूरमध्ये सक्रिय होणार असल्याचं स्पष्ट केल्याने अमोल कोल्हे यांचे टेन्शन वाढणार असल्याची चर्चा रंगली आहे.

### विकासावर बोलतो रडीचा डाव खेळत नाही

सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत बोलत असताना आमदार रोहित पवार यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला. हाच धागा पकडत अजित पवार यांनी जोरदार टोला लगावला. "मी सुरुवातीपासून कार्यकर्त्यांना सांगत होतो की शेवटच्या सभेमध्ये रडीचा डाव खेळला जाईल. आज आमचा पट्टा रडला मात्र मी विकास कामांवर मत मागतो भावनिक राजकारण करत नाही", अशी टीका अजित पवार यांनी केली आहे.

# निवडणूक मोदी विरुद्ध गांधी अशीच होणार!

## दोनही प्रमुख नेत्यांच्या झाल्या पुण्यात सभा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीचा प्रचाराची सांगता होण्यासाठी आठवडा बाकी आहे. महायूतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीचे वसंत मोरे आणि एमआयएमचे अनिस सुंडके हे रिंगणात उतरले आहेत. चारही उमेदवारांचा प्रचार सुरू आहे. मात्र, लोकसभेची खरी लढत ही महायूतीचे मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर यांच्यातच होणार असल्याचे बोलले जात होते. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्या पाठोपाठ काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या पुण्यात झालेल्या जाहीर सभांनंतर पुणे लोकसभेच्या लढतीत ट्विस्ट आला आहे.**




पुणे लोकसची लढत ही आता मोहोळ विरुद्ध धंगेकर अशी न होता ती आता पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 29 एप्रिलला पुण्यातील रेसकोर्स मैदानावर भव्य सभा झाली तर या सभेला काउंटर करण्याच्या दृष्टीने महाविकास आघाडीने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची सभा घेतली. 3 मे रोजी पुण्यातील एसएसपीएमएसच्या मैदानावर ही सभा झाली.

या दोन प्रमुख नेत्यांच्या सभा झाल्यानंतर उमेदवारांच्या एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोपांच्या चर्चा आता मागे पडल्या आहेत. नरेंद्र मोदींनी त्यांच्या भाषणात उल्लेख केलेले राष्ट्रीय मुद्दे, पुण्याच्या संदर्भात केलेल्या गेल्या दहा वर्षांत झालेली विकासाची कामे आणि भविष्यातील विकासाचे व्हीजन आणि राहुल गांधींनी त्यांच्या भाषणात केलेल्या मुद्यांची चर्चा सध्या होताना दिसते आहे. पुण्यातील दोन उमेदवारांच्या तुलनेपेक्षा ही देशाची निवडणूक आहे. त्यामुळे या दोन नेत्यांमधील तुलना करूनच मतदान करण्याचा सूर उमटताना दिसत आहे. आपसुकच गेल्या काही दिवसांपासून मोहोळ विरुद्ध धंगेकर या लढतीला आता नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी असे स्वरूप आले आहे. एकीकडे भाजपा आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांच्यात रण पेटलेलं असतांना, पूर्वी कधी न वापरल्या गेलेल्या भाषेचा एकमेकांविरुद्ध वापर होत असतांना, दुसरीकडे 'उद्धव माझे शत्रू नाहीत', हे मोदींनी म्हणणं, याची चर्चा लगेचच सगळीकडे सुरु झाली. दोन परस्परविरोधी भावना, एकाच वेळेस खेळामध्ये आल्या.

### बारामतीची लढत पवार विरुद्ध पवार अशी नाही



पुणे : बारामतीतील लोकसभेची लढत विरोधी पक्षनेते शरद पवार आणि अजित पवार यांच्यात नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यात आहे , असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सांगितले.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा तीनवेळच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याशी सामना आहे, त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांच्या कन्या आहेत.
जिल्ह्यातील इंदापूर येथे एका सभेला संबोधित करताना फडणवीस यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत (अविभाजित) राष्ट्रवादीचे उमेदवार दत्तात्रय भरणे यांच्याकडून पराभूत झालेले भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांच्या समर्थकांना आता गेलेले काम मागे टाकून मोठ्या ध्येयासाठी जोमाने कामाला लागण्यास सांगितले. मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान. "काहींना वाटते की बारामतीची लढत शरद पवार आणि अजित पवार यांच्यात आहे. काहींना वाटते की ही लढत सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यातील आहे. मी तुम्हाला सांगतो की ही लढत पवार विरुद्ध पवार किंवा सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी नाही. मोदीजी आणि राहुल गांधी यांच्यात लढत आहे,' असा दावा फडणवीस यांनी केला. सुळे यांच्यावर हल्ला करताना फडणवीस म्हणाले की, त्यांनी जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्यासारख्या मोदी सरकारच्या ऐतिहासिक निर्णयांना विरोध केला आहे. "संसदेतील तिची भाषणे बघा. त्यामुळे बारामतीच्या जनतेने ठरवावे की त्यांचे खासदार मोदीजींनी घालून दिलेल्या विकासाच्या मार्गावर चालायचे की राहुल गांधींच्या विचारसरणीवर, जी समाजविघातक आहे आणि प्रगतीला खीळ घालण्याचे उद्दिष्ट आहे," ते म्हणाले. विरोधक सहानुभूती कार्ड खेळण्याचा प्रयत्न करतील परंतु मतदारांनी मोठ्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही ते म्हणाले. या भागातील कार्यकर्त्यांच्या आकांक्षांची मला पूर्ण जाणीव असून सर्वांना न्याय मिळेल, असे फडणवीस म्हणाले.

# कामगारांसाठी लढणारे लीडर्स हवेत!

## भाजपच्या व्यासपीठावर बसलेले डीलर नको-सचिन अहिर

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आपण संघटना म्हणून आलेल्या व्यक्ती कुठल्याही जातीच्या, धर्माचा, पक्षाचा आहेत. हे विचार करत नाही. पण, यावेळीची ही निवडणूक आपल्या सर्वांच्या जिवनाशी संबंधित निवडणूक आहे. आज देशाच्या हितासाठी आणि कामगारांच्या संघटित आणि असंघटित शक्तीसाठी लोकसभेमध्ये कामगारांचे प्रतिनिधी करणारे लोक पाठविण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. आपल्यासाठी लढणारे कामगारांचे लीडर्स पाहिजेत, भाजपच्या व्यासपीठावर बसलेले डीलर नको, पाहिजेत असे मत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख तथा आमदार सचिनभाऊ अहिर यांनी व्यक्त केले. ते आकुर्डी येथील खंडोबा सांस्कृतिक भवन येथे मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित कामगार मेळाव्यात ते बोलत होते.**




### आकुर्डीत संजोग वाघेरे यांच्या समर्थनार्थ कामगार संघटनांचा मेळावा

### उद्योगनगरीतील कामगारांनी दिला

### "मस्तवाल भाजप हटाव"चा नारा महाविकास आघाडीला विजयी करण्याचा कामगारांचा संकल्प

या वेळी मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील, कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष (इंटक) डॉ. कैलास कदम, शिवसेना शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, सीआयटीयूचे पुणे जिल्हा अध्यक्ष कॉ. अजित अभ्यंकर, अखिल भारतीय कामगार सेनेचे डॉ. रघुनाथराव कुचिक, मेघाताई थत्ते, किरण मोघे, श्रमिक एकता महासंघाचे दिलीप पवार, राष्ट्रीय श्रमिक एकता महासंघाचे किशोर ढोकळे, आयटकचे कॉ. अनिल रोहम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे गणेश दराडे, सीटूचे वसंत पवार, कष्टकरी संघर्ष महासंघाचे काशिनाथ नखाते, टाटा मोटर्स युनियनचे शिशुपाल ठोमर, इंटकचे मनोहर गाडेकर, संरक्षण कामगार संघटनेचे सुनील भालेकर, बँक कर्मचारी संघाचे सुनील देसाई, टाटा मोटर्स युनियनचे सतीश काकडे, पीएमपीएलचे राजेंद्र खराडे यांच्यासह कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते. आमदार सचिन अहिर पुढे म्हणाले, देशाच्या पंतप्रधान गजनी झालेले आहेत. 2019 ला काय बोलले, 2014 ला काय बोलले, 2024 मध्ये बोलत नाही. त्यांनीच सांगितलं शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या जीवनामध्ये अच्छे दिन येतील आणि आता जर अशी अवस्था आहे. मात्र, कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा होत नाही. शेतकरी, तरुण, महिला आणि बेरोजगारी यांना काय देणार त्याची चर्चा होत नाही. सध्या देशाचे पंतप्रधान इकडे येतात 'असली नकलीचा वाद' करतात आणि भुताटकी लागल्याप्रमाणे आत्मा शोधण्याचे काम चालू आहे. देशातल्या स्तरावरच्या प्रश्नांवर आणि विषयाबाबत चर्चा करत नाहीत. त्यांच्या पायाखालची वाळू घसरत चाललेली आहे. ज्यावेळी सर्व मुद्दे संपतात कुठच्याही मुद्द्याला साथ मिळत नाही. मग जाती जाती आणि धर्माधर्मामध्ये तिढा निर्माण करून आपल्यामध्ये मतभेद निर्माण करून परत एकदा सत्तेवरती बसण्याचा तो त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे.

जाहीरनामांमध्ये अग्निविरची योजना रद्द करू कायमस्वरूपी काम देणारी योजना आणण्याचं काम करू. सरकारी कर्मचाऱ्यांची आतापर्यंत सव्वा लाख पद भरले गेले नाहीये म्हणून पहिला काम सरकार मध्ये आल्यानंतर लाभ दोन लाख दरवर्षी एक सरकारी कर्मचाऱ्यांची जे कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने काम चाललेले ते रद्द करून त्या लोकांना देखील रोजगार देण्याचे काम करू हे जाहीरनामांमध्ये आहे. सुसक्षित बेरोजगारांना भत्ता देण्याचे काम केले जाईल. जेणेकरून त्याची घर आणि कुटुंब चालवण्याची त्यांची परिस्थिती होईल, अशी देखील या जाहीरनाम्यामध्ये काम केलेलं आहे. उद्धव ठाकरे साहेबांनी स्पष्ट केलेले आहे की, सर्वांत प्रथम बाहेर गेलेले महाराष्ट्रातील उद्योग परत आणण्याचे आहेत. आपल्यातला एक कामगार संजोग वाघेरे पाटील उद्या जर लोकसभेमध्ये गेले तर हक्काने त्यांच्याकडून आपले प्रश्न सोडून घेऊ शकतो. वातावरण बदलत आहे. ज्यावेळी इतिहास लिहला जाईल.

### कामगारांचा आवाज बनणार: संजोग वाघेरे

उमेदवार संजोग वाघेरे पाटील बोलताना म्हणाले की, ही निवडणूक आपल्या अस्मितेची आहे. देशाची प्रगती झाली का, कामगारांची प्रगती झाली का ? आपल्या शेतकऱ्यांची प्रगती झाली का ? देशामध्ये नवीन उद्योगधंदे आलेत का ? जे आहेत ते उद्योगधंदे टिकलेत का ? कामगार काय करू शकतो, हे यापूर्वी आपण देशाला, राज्याला आणि भांडवलदारांना दाखवले आहे. कामगारांची ताकद फार मोठी आहे. कामगार क्रांती आणू शकतो आणि तीच क्रांतीची मशाल आपल्याला आता लोकसभेमध्ये पाठवण्याचे काम कामगारांनी केले पाहिजे. सरकारने जे कायदे बदललेले आहेत ते कायदे रद्द केल्याशिवाय मी शांत बसणार नाही. मी तुम्हाला शब्द देतो आणि खात्री देतो जोपर्यंत हे कायदे रद्द होत नाही. तोपर्यंत कामगार म्हणून मी त्या ठिकाणी लढा देत राहणार. अनेक वर्ष कामगारांच्या व्यथा कामगारांचे जे प्रश्न आणि नीमचे प्रश्न आहेत. त्यासाठी बाजू मांडण्याचे काम करणार आहे. मी सुद्धा कामगार असल्यामुळे कामगारांच्या व्यथा मी जाणतो. कामगारांना त्यांच्या हक्काची पेन्शन मिळाली पाहिजे. आशा सेविकेंचा पगार दुप्पट करण्यासठी प्रयत्न करणार आहे. तसेच फोर्स मोटर्स कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्या खांद्याला खांदा लावून काम करेल याची खात्री देतो. कामगारांच्या प्रती जी क्रांतीची मशाल आहे. ही मशाल आपल्या कामगारांचे प्रतीक आहे. कामगारांचा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्या, अशी साद उपस्थित कामगार वर्गाला घातली.

# बारणे यांच्या प्रचारासाठी भाजपा 'डोअर टू डोअर' प्रचार

## भाजपचे मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांची माहिती

**। तळेगाव दाभाडे ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी मतदान होणार आहे. प्रचारासाठी शेवटचा एक आठवडा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी 'डोअर टू डोअर' प्रचार मोहीम हाती घेतली असल्याची माहिती भाजपचे मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनी दिली. मावळ लोकसभा मतदारसंघातील



शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी भाजपने मावळ तालुक्यात आघाडी घेतली आहे. बारणे यांच्या प्रचारासाठी मावळ विधानसभा मतदार संघातील सर्व 381 बूथवर भारतीय जनता पार्टी व महायुती कडून 'डोअर टू डोअर' प्रचार करून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी श्रीरंग बारणे यांना मत देऊन प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले जात आहे.

### आज देवेंद्र फडणवीस यांची सभा

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी (दि. 6) जाहीर सभा होणार आहे. ही सभा कापसे लॉन्स, रहाटणी येथे सोमवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. मावळ विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या प्रचार सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन देखील रविंद्र भेगडे यांनी केले आहे.


# देशात 'मतदान सक्तीचे'?



## भूमिका

**मतदानाची टक्केवारी दिवसेंदिवस घटत चालली आहे. ही बाब जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशासाठी एकप्रकारे लाजीरवाणी म्हणावी अशी असली तरी अलिकडच्या काळात देशातील राजकारणाचा घसरलेला दर्जा, राजकीय पक्षांवरील जनतेचा उडालेला विश्वास आणि उदासिनता ही प्रमुख कारणे त्यासाठी सांगता येतील.**

त्यामुळे राजकारणाचा दर्जा सांभाळण्यासोबतच नागरिकांमधील उदासिनता दूर करण्यासाठी सरकारला पावले उचलण्याची आणि लोकशाहीचा हक्क म्हणून मतदान सक्तीचे करण्याची गरज निर्माण झाली आहे. हजारो जणांनी प्राणाची आहुती दिल्यानंतर आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून उणीपुरी पंच्याहत्तर वर्षे झाली. देश स्वातंत्र झाला, तेव्हा साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. शिक्षणाच्या सोयी- सुविधाही फारश्या नव्हत्या. पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत शिक्षणासाठी भरघोस तरतुदी करण्यात आल्या. आज देशातील चारदोन राज्ये सोडली तर साक्षरतेचे प्रमाण समाधानकारकरित्या वाढले आहे. 'औद्योगिक क्रांती' 'हरित क्रांती' फलस्वरूप होऊन, पारतंत्र्यात उपासमार सोसणाऱ्या भारतीयांच्या पोटाला दोन वेळचे अन्न मिळू लागले. हरित क्रांतीचे पीक रानारानात तरारले. देश अन्नधान्याबाबतीत स्वयंपूर्ण



झाला. औद्योगिकवाढीचे चक्र देशभर फिरू लागले आणि आर्थिक प्रगतीची फळे देशभर दिसू लागली. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या. व्यापार उदिमांची भरभराट झाली. त्यातच संगणक युगाने जोराची मुसंडी मारली. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर देशाने आर्थिक प्रगतीची झेप घेतली. मात्र प्रगतीची ही फळे सर्वांना सारख्या प्रमाणात मिळाली नाहीत. ज्यांना शिक्षणाची संधी मिळाली, ती काही मोजकी मंडळी शिकली, त्यांचीच नोकरी- उद्योगधंद्याद्वारे प्रगती झाली. थोडी मूठभर मंडळी, मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्ग, व्यापारी, कारखानदार आणि शेअर मार्केटचा जुगार खेळून श्रीमंत झाली. अचानक श्रीमंत झालेली मंडळी चंगळवादाकडे वळली, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करू लागली. 'आम्ही कर भरतो म्हणजे देशावर आणि देशवासीयांवर महान उपकार करतो' अशी सोईस्कर समजूत करून ही मंडळी आज समाजात वावरताना दिसत आहेत. शिक्षित चंगळवादी मंडळी भरल्यापोटी कारखान्यात, कार्यालयात, रेल्वेत, मोटारीत, रस्त्यावर, पार्टीत, क्लबमध्ये 'भ्रष्टाचार किती बोकाळलाय,'राजकारणी कसे हरामखोर आहेत', 'लोकशाहीची कशी वाट लागलीय', या विषयांवर 'प्याले'रिचवीत पोटतिडकीने पोपटपंची करताना आढळतात. ही मंडळी सर्व चर्चा करताना आपण स्वतःला सोडून इतरांबद्दलच बोलत राहतात. लोकशाही, राजकारण, सामाजिक बांधिलकी अशा विषयांवर सवंग चर्चा करणारे हे सर्व बुद्धिवादी 'चर्चील' नेमक्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मतदान करायचे सोडून पिकनिक स्पॉटवर जाऊन पिता- पिता पुन्हा चर्चेचा आनंद घेताना आढळतात. देशाचा एक सुबुद्ध नागरिक म्हणून आपण मतदान न करून राष्ट्रीय कर्तव्यात कसूर करीत आहोत याची जरासुद्धा खंत या तथाकथित बुद्धिवादी बडबडणाऱ्यांना वाटत नाही, हे या देशाचे खरे दुर्दैव आहे. ग्रामीण भागात कष्ट करणारी, डोंगरदऱ्यात दुर्गम भागात राबणारी गोरगरीब जनता, कामधंदा सोडून, प्रसंगी प्रवासखर्चासाठी पदरमोड करून मतदानाचे 'पवित्र कर्तव्य'पार पाडताना आढळते. खेड्यापाड्यात अगदी दुर्गम भागातही ७० ते ८० टक्के मतदान होताना आढळते मात्र लोकशाहीची शेलकी फळे चाखलेली आणि लोडशेडिंगची झळ न पोहचलेली शहरातील ही सुखासीन शाहणी, शहाजोग मंडळी, 'कसले मतदान करायचे' म्हणत मतदान केंद्राकडे तुच्छतेने पाठ फिरविताना आढळतात. त्यामुळे मोठ्या शहरात जेमतेम ३४ ते ४५ टक्केच मतदान होते ,त्यामुळे 'लायक' माणसे निवडून येत नाहीत. परिणामी प्राणांची आहुती देऊन मिळवलेल्या या स्वातंत्र्याचे 'मातेरे' होत आहे. देश आता पच्याहत्तरीचा झाला आहे. ज्येष्ठांच्या पंगतीत बसला आहे आणि म्हणूनच घटनाकर्त्यांची लोकशाहीची धारणा पूर्ण करण्यासाठी प्राप्त परिस्थितीत, देशातील ज्येष्ठ विचारवंतांनी, कायदेपंडितांनी, समाजधुरिणांनी आणि प्रामाणिक पुढाऱ्यांनीही 'मतदान सक्तीचे' करण्यासंबंधी आवश्यक ती कायदेशीर तरतूद

## संपादकीय »

# पुष्किनचे रहस्य

***पुष्किनचे स्वातंत्र्यप्रेम, स्वच्छंदतावाद आणि मानवी दुःखाची सखोल जाणीव यांचा विचारही न करता 'पुष्किन आमचाच' असे रशियन सत्ताधारी वर्गाला म्हणायचे आहे..***

देशात गेले तरी तेथे त्यांची ससेहोलपट करणे, थोडयाथोडक्या नव्हे तर दीडेकशे पुतिनविरोधी पत्रकारांचा आकस्मिक मृत्यू ओढवणे, लोकशाही म्हणवणाऱ्या अन्य मोठया देशांमधील निवडणुकांवर इंटरनेट आणि समाजमाध्यमांद्वारे घुसखोरी करून आपल्याला हवे तेच सरकार येईल यासाठी उचापती करणे.. यापैकी काहीही पुतिन यांचा रशिया घडवून आणू शकतो. पण या पाताळयंत्रीपणालाही काहीएक पातळी असावी की नाही? वाचनालयांमधून पुस्तके चोरणे- सभ्य भाषेत 'पुस्तक ढापणे'- हेदेखील आता पुतिनाधीन रशियाने करावे? पण तेही झालेच. थोडेथोडके नाही तर मोठया प्रमाणावर झाले. जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, फिनलंड, पोलंड, इतकेच नव्हे तर लाटव्हिया, लिथुआनिया यांसारख्या गोरगरीब देशांतील सार्वजनिक वाचनालयांतून केवळ रशियन पुस्तकांच्याच जुन्या प्रतींची चोरी गेल्या दोन वर्षांत झाली.

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात दहशतवाद्यांनी भारतीय हवाई दलाच्या वाहनांवर गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात पाच जवान जखमी झाले, त्यापैकी एकाला हौतात्म्य आले. राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या पीर पंजाल भागात गेल्या पंधरवड्यात, २२ एप्रिल व २८ एप्रिल रोजीही दहशतवादी हल्ले घडले होते.

# हल्ले होणार नाहीत, असे उपाय हवे

पण त्यांचे लक्ष्य स्थानिक अधिकारी अथवा कर्मचारी हे होते. आपल्या देशात चालू असलेल्या लोकशाही प्रक्रियेला बाधा आणण्याच्या प्रयत्नाला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आपले हवाई दल सक्षम आहेच. पण २०२१ पासून सुरू झालेल्या घटनांमध्ये आतापर्यंत २१ जवानांचा बळी गेला आहे आणि अनेक जवान जखमी झाले आहेत. भरून न येणारे हे मोठे नुकसान कसे कमी करता येईल यासाठी कायमस्वरूपी उपाय केले पाहिजेत. कर्नाटकचे विद्यामान खासदार प्रज्ज्वल रेवण्णा यांनी महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे ध्वनिचित्रमुद्रण उपलब्ध आहे. तरीही सीतारामन यांनी 'विरोधक याचे राजकारण करत आहेत,' असे म्हणणे दुर्दैवी आहे. यात कसले राजकारण आहे, हे सीतारामन यांनीच सांगावे. महिलांवरील लैंगिक अत्याचार ही दुर्लक्ष करण्यासारखी बाब नसून, तो अक्षम्य गुन्हा आहे. कुस्ती प्रशिक्षक ब्रजभूषण सिंह असो प्रज्ज्वल रेवण्णा, सारे एकाच माळेचे मणी ठरतात. त्यातही भाजपच्या



कोणीही गुन्हा करावा, सरकार नेहमीच त्यांना पाठीशी घालत आले आहे- याउलट विरोधकांनी कोणताही गुन्हा केला की, त्यांच्याविरुद्ध तत्परतेने कारवाई करून, त्यांना तुरुंगात टाकायचे, यातून 'कायद्यापुढे सारे समान' या घटनात्मक तत्त्वाचे काय पालन होते? हासुद्धा गोबेल्स नीतीचाच भाग नाही का? कारण यापूर्वी या सदरात लेखक विशेषतः अर्थविषयक प्रश्नांविषयी मत मांडत. जीएसटीवर टीका-टिप्पणी करणे, हा तर त्यांचा आवडता विषय. परंतु याविषयीच्या ताज्या वृत्तांकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. एप्रिल २०२४ मधील जीएसटी महसूल संकलन आतापर्यंतचे सर्वाधिक २.१० लाख कोटी रुपये आहे, त्यातही पाच-सहा छोट्या राज्यांची अल्पशी घट वगळता उर्वरित राज्यांची महसुली उत्पन्न २५ टक्क्यांच्या पुढेच आहे. या पद्धतीने महसूल संकलन होत राहिल्यास सरकारच्या एकूण महसुलात जीएसटीचा वाटा ४० टक्क्यांच्या आसपास राहिला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांच्या शेअर बाजारातील चढता क्रमसुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेतील आत्मविश्वास वाढवत आहे. एवढे सारे वास्तववादी असूनदेखील, लेखक या वृत्तांची दखल न घेता, केवळ जाहीरनाम्यावर चार चार लेख लिहीत असतील तर हासुद्धा एक प्रकारे गोबेल्स नीतीचाच भाग असू शकतो.भाजपचा अभिमान' हा 'समोरच्या बाकावरून'मधील लेख वाचून खूपच मनोरंजन झाले. अल्पसंख्याक लांगूलचालनासाठी जगप्रसिद्ध असणाऱ्या काँग्रेसने आम्ही 'मुस्लीम' हा शब्दच वापरला नाही म्हणणे म्हणजे जणू जनतेला अल्पसंख्याक म्हणजे कोण ते माहीतच नसल्यासारखे बोलणे होय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवार माढ्याचा प्रश्न सोडवू शकले नाहीत

## माळशिरस अकलूज आमच्या पाठीशी : फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकांना नेहमी वेगवेगळ्या गोष्टी सांगून फसवणारे शरद पवार माढ्याचे खासदार असताना त्यांनी मतदारसंघाचा एकही प्रश्न सोडवला नाही. मतदार संघात पाण्याचा एकही थेंब आणला नाही. विकास करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या उमेदवाराच्या तुतारीची पिपाणी रणजीतसिंह नाईक निंबाळकर केल्याशिवाय राहणार नाहीत असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्यातील फलटण येथे सांगितले.मोदी हे एकमेव नेते आहे की ते सर्वांचं भलं करू शकतात ज्या देशाचा नेता सक्षम, कणखर असतो तो देशच प्रगतीपथावर राहतो असेही फडणवीस म्हणाले,**



महायुतीचे माढा मतदारसंघातील उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या सांगता प्रचार सभेत फडणवीस बोलत होते. यावेळी रणजितसिंह नाईक निंबाळकर, महादेव जानकर, मतदारसंघाचे समन्वयक प्रसाद लाड आदी उपस्थित होते. यावेळी रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले.फडणवीस म्हणाले, ही लढाई रणजितसिंह नाईक निंबाळकर व धैर्यशील मोहिते पाटील अशी नाही तर या पाठीमागचे मोठे गणित माढा मतदारसंघात दडलेले आहे. या मतदारसंघात पूर्वी खासदार राहिलेले शरद पवार यांनी सांगितले होते की माढा मतदारसंघातील सर्व प्रश्न सोडवितो. त्यावेळी ते देशाचे नेते होते, केंद्रात मंत्री होते. पण त्यांच्या काळात या भागात पाण्याचा एकही थेंब आला नाही. कोणताही विकास झाला नाही. ते करू शकले नाहीत. या भागात येणारे पाणी तुमच्याकडे पोहोचल्यास ते कुठे गेले होते हे तुम्हाला कळले असते म्हणून त्यांनी याकडे बघितले नाही असा बारामतीचा उल्लेख न करता ते बोलले. तुम्ही रणजीतला निवडून दिल्यानंतर तुमचे चोरीला गेलेले पाणी परत आणले आहे. त्याचे काम सुरू झाले आहे.या मतदारसंघात देशाचे किंवा परदेशाचे नेते येऊ द्यात. पण रणजीतच कोणीही वाकड करू शकणार नाही. विरोधी नेते म्हणतात माळशिरस अकलूज आमच्या पाठीशी आहे. परंतु आता फलटणकरांनीच रणजीतचा विषय अस्मितेचा केला आहे. रामराजे नाईक निंबाळकर यांनी उचित निर्णय घेतला नाही. काही विषय अस्मितेचे आणि विकासाचे असतात. त्याच्या विरोधात निर्णय घेतला तर लोक आपल्याला लक्षात ठेवत नाहीत. काही झाले तरी फलटणमध्ये कमळ फुलणार आहे आणि मागील मताधिक्यापेक्षा जास्त मतांनी भाजपचा उमेदवार निवडून येणार आहे. या माढा मतदारसंघासाठी भीमा स्थिरीकरण,वासना वंगना योजना, नीरा देवधर आणि धोम बलकवडीच काम होऊ द्यात या परिसरात एकही गाव दुष्काळी राहणार नाही. फलटण पंढरपूर रेल्वेचे काम ही मार्गी लावल आहे. या भागात विशेष कॉरिडॉर होत असल्यामुळे एमआयडीसी ही मोठ्या प्रमाणात येणार आहे. त्यामुळे येथील तरुणांना कोठेही रोजगारासाठी बाहेर जावे लागणार नाही. हा सर्व भाग आता पाणीदार होईल. रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना पंतप्रधान स्वतः ओळखतात आणि त्यांच्या कामाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत. महाराष्ट्रात शिंदे सरकार आल्यानंतर या परिसराला मोठ्या प्रमाणात निधी देण्याचा निर्णय आम्ही घेतला होता. यावेळी रणजितसिंह नाईक निंबाळकर महादेव जानकर आदींची भाषणे झाली.

### काही विषय विकासाचे असतात

यावेळी रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी मोठे शक्ति प्रदर्शन केले.फडणवीस म्हणाले, ही लढाई रणजितसिंह नाईक निंबाळकर व धैर्यशील मोहिते पाटील अशी नाही तर या पाठीमागचे मोठे गणित माढा मतदारसंघात दडलेले आहे. या मतदारसंघात पूर्वी खासदार राहिलेले शरद पवार यांनी सांगितले होते की माढा मतदारसंघातील सर्व प्रश्न सोडवितो. त्यावेळी ते देशाचे नेते होते, केंद्रात मंत्री होते. पण त्यांच्या काळात या भागात पाण्याचा एकही थेंब आला नाही. कोणताही विकास झाला नाही. ते करू शकले नाहीत. या भागात येणारे पाणी तुमच्याकडे पोहोचल्यास ते कुठे गेले होते हे तुम्हाला कळले असते म्हणून त्यांनी याकडे बघितले नाही असा बारामतीचा उल्लेख न करता ते बोलले. तुम्ही रणजीतला निवडून दिल्यानंतर तुमचे चोरीला गेलेले पाणी परत आणले आहे. त्याचे काम सुरू झाले आहे.या मतदारसंघात देशाचे किंवा परदेशाचे नेते येऊ द्यात. पण रणजीतच कोणीही वाकड करू शकणार नाही. विरोधी नेते म्हणतात माळशिरस अकलूज आमच्या पाठीशी आहे. परंतु आता फलटणकरांनीच रणजीतचा विषय अस्मितेचा केला आहे. रामराजे नाईक निंबाळकर यांनी उचित निर्णय घेतला नाही. काही विषय अस्मितेचे आणि विकासाचे असतात.


# उद्धव ठाकरे यांच्यावर बोलताना मोदी गोंधळलेत

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण मोदी सराकारवर जोरदार टीका

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोदी हुकुमशाहीकडे चालले. त्यासाठी रशिया, चीन, उत्तर कोरियाच्या नेतृत्वाप्रमाणे त्यांचे व्यक्तिस्तोम सुरु आहे. परंतु, केंद्रात निश्चितपणे सत्तांतराचे वातावरण असल्याने शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना, मोदी गोंधळलेत अशी टीका चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केली.**

भरमसाठ करवाढ, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडील दुर्लक्ष आणि अत्याचाराच्या मुद्द्यांसह संविधान वाचवण्यासाठीची लढाई आहे. त्यात शेतकरी, कष्टकरी, युवक, महिलांसह सर्वच घटक मोदींना माफ करणार नाहीत. त्यामुळे भाजपकडील पूर्वीच्या ३१ टक्के मतातही घट होईल. संसदेतील विरोधी ३८ पक्ष त्यांच्या समोर असल्याने कोणत्याही राज्यात भाजपला पूर्वीप्रमाणे यश मिळणार नाही. 'चारशे'पार सोडा, गतखेपेच्या ३०३ पेक्षाही खूपच कमी जागा मिळून भाजपला मित्रपक्षांच्या सहकार्यानेही सत्ता मिळणार नाही. केंद्रात निश्चितपणे सत्तांतर होईल, त्यात महाराष्ट्राची भूमिका महत्वाची





असेल, विरोधी पक्षांना अनपेक्षित घवघवीत यश मिळेल असा दावा चव्हाण यांनी केला. कर्नाटकातील प्रज्वल रेवण्णा यांचे लैंगिक शोषणप्रकरण आणि निवडणूक रोख्यांवरून चव्हाण यांनी टीकास्त्र सोडले.डॉ. मनमोहन सिंग यांच्या केंद्र सरकारमधील देशाचा आर्थिक विकासदर मोदीकाळात घसरलेला आहे. पूर्वीचा विकासदर कायम असता तर जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नव्हेतर तिसऱ्या स्थानावर असती. पण, केंद्र सरकारकडे आज पगाराला, खर्चालाही पैसे नाहीत. महागाई, भ्रष्टाचारामुळे जनता ग्रासल्याची टीका चव्हाण यांनी केली.राज्यात ठाकरे सरकार राहिले असते तर लोकसभेला 'महायुती'ची एकही जागा निवडून आली नसती. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस भाजपने फोडले. पण, लोकसभा निवडणुकीनंतर समीकरणे बदलतील. राज्यातील दोन पक्ष संपतील किंवा इतर पक्षांमध्ये विलीन होतील असे भाकीत करीत चव्हाण यांनी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### प्रकाश आंबेडकरांचा समाचार

डॉ. प्रकाश आंबेडकरांनी साताऱ्यातील काँग्रेसचे बडे प्रस्थ राज्यपालपदासाठी भाजपच्या वाटेवर असल्याचे खळबळजनक विधान केले असल्यासंदर्भात चव्हाण म्हणाले, मोदी 'वंचित'च्या माध्यमातून विरोधी मतांचे विभाजन करीत आहेत. 'वंचित'ची साथ 'एमआयएम'नेही सोडली असताना, 'संविधान बचाव'च्या लढ्यात प्रकाश आंबेडकर आमच्या सोबत नसल्याने आंबेडकरी जनताही त्यांना थारा देणार नसल्याची टीका चव्हाण यांनी केली.

# टेप रेकॉर्डरसारखे काम करू नका!

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयांवर ताशेरे

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सर्वोच्च न्यायालयासमोर अनेक महत्वाच्या प्रकरणांची सुनावणी होत असते. सुनावणीनंतर न्यायालय अनेक महत्वाचे निर्णय देत असते. तसेच न्यायालयासमोर होणाऱ्या सुनावणीवेळी अनेक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले जात असतात. आता सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीवेळी इतर न्यायालयांच्या कामकाजाबाबत भाष्य केले आहे. 'न्यायालयांनी फक्त टेप रेकॉर्डर सारखे काम करू नये', असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.**



सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'न्यायालयांनी खटल्यांच्या सुनावणी वेळी सहभागाची भूमिका बजावली पाहिजे. तसेच साक्षीदारांच्या साक्ष नोंदवताना फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम न करता फौजदारी खटल्यांच्या सुनावणीवेळी सरकारी वकील साक्षीदारांची कोणतीही प्रभावी आणि अर्थपूर्ण उलटतपासणी करत नाहीत. त्यामुळे न्यायाच्या हितासाठी न्यायाधीशांनी कार्यवाहीवर लक्ष ठेवले पाहिजे. तसेच सरकारी वकील जर एखाद्या प्रकरणासंदर्भात गाफील असतील तर न्यायालयाने कार्यवाहीवर प्रभावीपणे लक्ष ठेवले पाहिजे. असे केल्यास त्या प्रकरणाच्या सत्यापर्यंत पोहोचता येईल', असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.फौजदारी न्याय व्यवस्थेचा पाया म्हणून सार्वजनिक अभियोग सेवा आणि न्यायपालिका यांच्यातील संबंधांचे वर्णन करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सरकारी वकीलांच्या नियुक्तीमध्ये राजकीय विचाराचा घटक असता कामा नये. दरम्यान, १९९५ मध्ये पत्नीच्या हत्येप्रकरणी एका पुरुषाला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली, या प्रकरणाचा निकाल देताना वरील निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावेळी या खंडपीठात न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही समावेश होता. दरम्यान, शुक्रवारी दिलेल्या निकालात खंडपीठाने म्हटले, "सत्यापर्यंत पोहोचणे आणि तसेच न्याय देणे हे न्यायालयाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे न्यायालयांना सुनावणीमध्ये सहभागाची भूमिका बजावावी लागेल. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यासाठी फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम करू नये. न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सुनावणीत सक्रीय सहभाग घेणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक वाटणारी सर्व माहिती साक्षीदारांकडून घेणे हे अपेक्षित आहे, असे निरीक्षण नोंदवले. याबरोबरच सरकारी वकिलांसारख्या पदावर नियुक्ती करत असताना त्या व्यक्तीच्या योग्यतेकडे लक्ष दिले पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले.सर्वोच्च न्यायालयासमोर अनेक महत्वाच्या प्रकरणांची सुनावणी होत असते. सुनावणीनंतर न्यायालय अनेक महत्वाचे निर्णय देत असते. तसेच न्यायालयासमोर होणाऱ्या सुनावणीवेळी अनेक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले जात असतात. आता सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीवेळी इतर न्यायालयांच्या कामकाजाबाबत भाष्य केले आहे. 'न्यायालयांनी फक्त टेप रेकॉर्डर सारखे काम करू नये', असे सर्वोच्च न्यायालयाने म्हट त्यामुळे न्यायाच्या हितासाठी न्यायाधीशांनी कार्यवाहीवर लक्ष ठेवले पाहिजे. तसेच सरकारी वकील जर एखाद्या प्रकरणासंदर्भात गाफील असतील तर न्यायालयाने कार्यवाहीवर प्रभावीपणे लक्ष ठेवले पाहिजे.

### साक्षीदारांकडून घेणे हे अपेक्षित

असे केल्यास त्या प्रकरणाच्या सत्यापर्यंत पोहोचता येईल', असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.फौजदारी न्याय व्यवस्थेचा पाया म्हणून सार्वजनिक अभियोग सेवा आणि न्यायपालिका यांच्यातील संबंधांचे वर्णन करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सरकारी वकीलांच्या नियुक्तीमध्ये राजकीय विचाराचा घटक असता कामा नये. दरम्यान, १९९५ मध्ये पत्नीच्या हत्येप्रकरणी एका पुरुषाला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली, या प्रकरणाचा निकाल देताना वरील निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावेळी या खंडपीठात न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही समावेश होता. दरम्यान, शुक्रवारी दिलेल्या निकालात खंडपीठाने म्हटले, "सत्यापर्यंत पोहोचणे आणि तसेच न्याय देणे हे न्यायालयाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे न्यायालयांना सुनावणीमध्ये सहभागाची भूमिका बजावावी लागेल. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यासाठी फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम करू नये. न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सुनावणीत सक्रीय सहभाग घेणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक वाटणारी सर्व माहिती साक्षीदारांकडून घेणे हे अपेक्षित आहे.

# निवडणूक लढण्यास काँग्रेस उमेदवाराचा नकार

## पक्षाकडून निधी नसल्याने मोहंती यांची असमर्थता

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पक्षाकडून निधी मिळत नसल्याचा आरोप करत पुरी लोकसभेतील काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुचरिता मोहंती यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला. तसेच त्यांनी पक्षाची उमेदवारी परत केली. काँग्रेसचे माजी खासदार ब्रजमोहन मोहंती यांची कन्या असलेल्या सुचरिता यांनी शुक्रवारी काँग्रेसचे सरचिटणीस यांना ई-मेल पाठवून निधी नाकारल्याने पुरी लोकसभा मतदारसंघातील प्रचाराला मोठा फटका बसल्याचा दावा केला आहे.**



स्वत:च्या खर्चातून निवडणूक प्रचार करण्यास सांगितल्याचा आरोप मोहंती यांनी केला.मी व्यावसायिक पत्रकार होते, जिने १० वर्षांपूर्वी राजकारणात प्रवेश केला. पुरोगामी राजकारणाला पाठिंबा देण्यासाठी मी देणगी गोळा करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला आतापर्यंत फारसे यश मिळाले नाही. 'निधी गोळा करण्यास असमर्थ ठरल्याने पुरी लोकसभा मतदारसंघात प्रभावी प्रचारात निधी मिळावा म्हणून पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वासह सर्व वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधला होता. केवळ निधीची कमतरता असल्यानेच पुरीमधील विजयापासून आम्ही दूर असल्याचे स्पष्ट आहे. मी निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ता कायम राहणार असून, राहुल गांधी हेच आमचे नेते असल्याचे त्यांनी सांगितले.माध्यमांशी बोलताना मोहंती म्हणाल्या की, मला पक्षाकडून निधी नाकारला गेला. पुरी लोकसभा मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघांमध्ये कमकुवत उमेदवारांना तिकीट देण्यात आले आहेत. भारतीय जनता पक्ष आणि बिजू जनता दलाकडे प्रचंड पैसा आहे. पुरी लोकसभेतून भाजपतर्फे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा तर बीजेडीतर्फे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त अरुण पटनाईक निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवार जेव्हा प्रचार सुरू करेल आणि गंभीरपणे लढेल, तेव्हाच निधी दिला जाईल. निवडणूक मैदानात येण्यापूर्वीच मोहंती यांनी निधी दिला नसल्याचा आरोप केला आहे.पक्षाकडून निधी मिळत नसल्याचा आरोप करत पुरी लोकसभेतील काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुचरिता मोहंती यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला.

### 10 वर्षांपूर्वी राजकारणात प्रवेश केला

पक्षाची उमेदवारी परत केली. काँग्रेसचे माजी खासदार ब्रजमोहन मोहंती यांची कन्या असलेल्या सुचरिता यांनी शुक्रवारी काँग्रेसचे सरचिटणीस यांना ई-मेल पाठवून निधी नाकारल्याने पुरी लोकसभा मतदारसंघातील प्रचाराला मोठा फटका बसल्याचा दावा केला आहे. ओडिशा काँग्रेसचे प्रभारी अजोय कुमार यांनी स्पष्टपणे स्वत:च्या खर्चातून निवडणूक प्रचार करण्यास सांगितल्याचा आरोप मोहंती यांनी केला.मी व्यावसायिक पत्रकार होते, जिने १० वर्षांपूर्वी राजकारणात प्रवेश केला. पुरोगामी राजकारणाला पाठिंबा देण्यासाठी मी देणगी गोळा करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला आतापर्यंत फारसे यश मिळाले नाही.

# नामंकित कॉमेडी शोमध्ये केली करण जोहरची नक्कल

चित्रपट निर्माता करण जोहर त्याच्या चित्रपटांबरोबरच फॅशन आणि लूक्समुळे नेहमी चर्चेत असतो. 'कॉफी विथ करण'मध्ये करणच्या स्पष्टवक्तेपणाचा अनुभव अनेक कलाकारांना आला आहे. परंतु आजकाल बॉलीवूड इंडस्ट्रीमधला लोकप्रिय 'केजो' त्याचं परखड मत सोशल मीडियावर शेअर करत असतो. नुकतीच त्याने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे. ही स्टोरी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. एका प्रतिष्ठित वाहिनीवरील कॉमेडी शोने करणची नक्कल करत त्याचा अपमान केला आहे, याबद्दल त्याने आपलं मत मांडलं आहे.करणने त्याच्या सोशल मीडियावर स्टोरी शेअर करत लिहिलं, "मी माझ्या आईबरोबर बसून टिव्ही बघत होतो आणि एका प्रतिष्ठित चॅनलवर मी एका नामांकित रिॲलिटी कॉमेडी शोचा प्रोमो पाहिला. त्यात एक कॉमेडी स्किट होतं ज्यात ते माझी नक्कल करत होते. त्यांनी अत्यंत वाईट नक्कल केली. ट्रोलर्स आणि निनावी लोकांकडून मी अशी अपेक्षा करू शकतो परंतु जेव्हा तुमचीच इंडस्ट्री अशा व्यक्तीचा अनादर करते जो व्यक्ती २५ वर्षांपासून या इंडस्ट्रीत आहे, तेव्हा काळानुसार सगळ्या गोष्टी आपोआप उघड होतात. यामुळे या गोष्टीचा मला राग नाही आला पण



मला याचं खूप वाईट वाटलं.दरम्यान, करणच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, करण जोहरचा 'योद्धा' चित्रपट १५ मार्चला प्रदर्शित झाला. यात सिद्धार्थ मल्होत्राने मुख्य भूमिका साकारली होती. तसेच सारा अली खान अभिनीत 'ए वतन मेरे वतन' स्वातंत्र्यसैनिक उषा मेहता यांच्या जीवनावर आधारित असलेला चित्रपट २१ मार्च रोजी ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित झाला."करण जोहरचा आगामी चित्रपट 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' लवकरच प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांची जोडी पाहायला मिळणार आहे. तर, आलिया भट्ट अभिनीत 'जिगरा' चित्रपटही लवकरचं प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपट निर्माता करण जोहर त्याच्या चित्रपटांबरोबरच फॅशन आणि लूक्समुळे नेहमी चर्चेत असतो. 'कॉफी विथ करण'मध्ये करणच्या स्पष्टवक्तेपणाचा अनुभव अनेक कलाकारांना आला आहे.

## रणबीर-आलियाच्या लेकीचा गोड अंदाज

बॉलीवूड कलाकारांपेक्षा सध्या सोशल मीडियावर स्टारकिड्सची मोठ्या प्रमाणात चर्चा असते. आलिया भट्ट आणि रणबीर कपूर या दोघांची जोडी कलाविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. परंतु, या दोघांपेक्षा जास्त आता त्यांची लेक राहा कपूर चर्चेत असते. तिचा गोड अंदाज, थक्क करणारे हावभाव या गोष्टींची सध्या नेटकऱ्यांना चांगलीच भुरळ पडली आहे. आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. अभिनेत्रीने ६ नोव्हेंबर २०२२ रोजी सोशल मीडियावर आनंदाची बातमी शेअर करत चाहत्यांना राहा कपूरचा जन्म झाल्याचं सांगितलं. यानंतर जवळपास वर्षभराने आलिया-रणबीरने त्यांच्या लेकीचा चेहरा सोशल मीडियावर रिव्हिल केला.२०२३ मध्ये ख्रिसमसच्या दिवशी आलिया-रणबीरने सर्वांना राहाची पहिली.

## मिनिटासाठी 1 कोटी मानधन

बॉलीवूड सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. आलिया भट्ट, दीपिका पदुकोण, प्रियांका चोप्रा अशा आघाडीच्या अभिनेत्रींना मागे टाकत एक अभिनेत्री अशी आहे; जी त्यांच्यापेक्षा जास्त मानधन घेते. मॉडेल व अभिनेत्री उर्वशी रौतेला एका मिनिटासाठी चक्क एक कोटी रुपये मानधन आकारते. 'डीएनए इंडिया'ने दिलेल्या माहितीनुसार, उर्वशी रौतेलाने तीन मिनिटांच्या गाण्यासाठी चक्क एक कोटी रुपयांचं मानधन स्वीकारलं होतं. या अभिनेत्रीनं 'स्कंद' चित्रपटात 'कल्ट मामा' गाण्यावर डान्स केला. या तीन मिनिटांच्या गाण्यासाठी उर्वशीनं चक्क तीन कोटींचं मानधन घेतलं होतं. म्हणजेच एका मिनिटासाठी उर्वशीनं एक कोटी रुपये मानधन घेतलं. त्यामुळे एका मिनिटासाठी एक कोटी मानधन घेणारी ती भारतातली पहिलीच अभिनेत्री ठरली.याआधी उर्वशी रौतेलानं चिरंजीवी अभिनीत 'वॉल्टेअर वीरैया'मधील गाण्यासाठी दोन कोटी रुपये मानधन घेतलं होतं. उर्वशी रौतेलाचे इन्स्टाग्रामवर ७१ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि तिची एकूण संपत्ती ५५० कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे. उर्वशी रौतेला 'फोर्ब्स'च्या टॉप १० मध्ये समाविष्ट होणारी सर्वांत तरुण भारतीयदेखील आहे.आता ही अभिनेत्री एका ६३ वर्षीय साऊथ सुपरस्टारबरोबर काम करण्यासाठी सज्ज झाली आहे. उर्वशी सध्या नंदामुरी बालकृष्णा यांच्यासह तिच्या 'एन बी के-१०९' या आगामी चित्रपटाची तयारी करीत आहे. चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्ससाठी तिला एम एम के



## आदित्य रॉय कपूर आणि अनन्या पांडेचं ब्रेकअप

गेली दोन वर्षे आदित्य रॉय कपूर आणि अनन्या पांडे एकमेकांना डेट करत असल्याचं बॉलीवूडमध्ये बोललं जात होतं. अभिनेत्रीने तिच्या रिलेशनशिपवर 'कॉफी विथ करण' या शोमध्ये देखील भाष्य केलं होतं. तसेच या दोघांचे एकत्र फिरायला गेल्याचे फोटो सुद्धा अनेक ठिकाणी व्हायरल झाले होते. सगळं उत्तम सुरू असतानाच गेल्या महिन्याभरापासून आदित्य आणि अनन्याचं ब्रेकअप झाल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. अशातच त्यांच्या जवळच्या मित्रांने दोघांच्या नात्याबाबत मोठा खुलासा केला आहे.आदित्य आणि अनन्याच्या जवळच्या मित्राने अलीकडेच 'टाइम्स ऑफ इंडिया'शी संवाद साधताना या दोघांच्या नात्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर यांचं ब्रेकअप झाल्याच्या वृत्ताला या जवळच्या मित्राने दुजोरा दिला आहे. "दोघेही साधरण महिन्याभरापूर्वी एकमेकांपासून वेगळे झाले आहेत. दोघांचं बॉण्डिंग खूपच स्ट्राँग होतं. परंतु, ते दोघेही वेगळं होणं हे आमच्यासाठी खूपच धक्कादायक आहे. सध्या अनन्या या ब्रेकअपच्या मानसिकतेतून सावरण्याचा प्रयत्न करत आहे. कोणासाठीही ब्रेकअप होणं हे दु:खदायकच असतं." असा खुलासा दोघांच्या जवळच्या मित्राने केला आहे. आदित्य गेल्या महिन्यात अनन्या पांडेची चुलत बहीण अलाना पांडेच्या डोहाळे जेवणाला उपस्थित राहिल्याचं पाहायला मिळालं. मात्र, त्यानंतर लगेचच आदित्य-अनन्यामध्ये काहीतरी बिनसलं असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता. अखेर या वृत्ताला त्यांच्याच जवळच्या मित्राने दुजोरा दिला आहे. अनन्या पांडेने काही दिवसांआधी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली होती. "जर एखादी एक मोठा धडा मिळतो. जर तुमचं एखाद्या गोष्टीवर खरंच तुमचं प्रेम असेल तर, ती गोष्ट कायम तुमच्या हृदयात राहते.

## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केलीये?

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिल्लीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध



# कोलकाताचा लखनऊवर मोठा विजय!

## 98 धावांच्या विजयासह पॉईंट्स टेबलमध्ये अव्वलस्थानी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**कोलकाता नाईट रायडर्सने लखनऊच्या घरच्या मैदानावर एलएसजी संघाचा ९८ धावांनी मोठा पराभव केला. केकेआरने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १५० धावाही करू शकला नाही. लखनऊची फलंदाजी बाजू फेल ठरल्याने संघ १३७ धावांवरच ऑल आऊट झाला. संघाकडून सर्वाधिक ३६ धावांची खेळी मार्कस स्टॉयनिसने केली. त्याच्याव्यतिरिक्त इतर सर्व फलंदाज स्वस्तात बाद झाले. या विजयासह लखनऊ आयपीएल २०२४ च्या पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी पोहोचला आहे**




२३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनऊ सुपर जायंट्स संघाची सुरुवात खराब झाली. ज्यात २० धावांवर त्यांनी पहिली विकेट अर्शिन कुलकर्णीच्या रूपाने गमवली, जो केवळ ९ धावा करून बाद झाला. यानंतर फलंदाजीला आलेल्या मार्कस स्टॉइनिसने केएल राहुलसह झपाट्याने धावा करायला सुरू केली. दोघांनी मिळून पहिल्या ६ षटकात संघाची धावसंख्या ५५ धावांपर्यंत नेली. ७० धावांवर लखनऊला दुसरा धक्का कर्णधार राहुलच्या (२२) रूपाने बसला. यानंतर संघाने लागोपाठ विकेट गमावल्या. लखनऊने ६ बाद १०९ धावा केल्या. लखनौचा डाव १३७ धावांवर आटोपून केकेआरने केवळ ९८ धावांनी सामना जिंकला नाही तर प्लेऑफमधील आपले स्थान जवळपास निश्चित केले. केकेआरकडून हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी ३ विकेट घेतले, आंद्रे रसेलने २ विकेट तर मिचेल स्टार्क आणि सुनील नरेन यांनी १-१ विकेट घेण्यात यश मिळवले. कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद २३५ धावा केल्या. सलामीवीर सुनील नारायणच्या ८१ धावांच्या खेळीवर मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अवघ्या ३९ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ८१ धावांची शानदार खेळी खेळली. याशिवाय केकेआरसाठी अंगक्रिश रघुवंशीने ३२ धावा केल्या तर शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या रमणदीप सिंगने केवळ ६ चेंडूंचा सामना करत २५ धावांची नाबाद धारदार खेळी खेळून संघाची धावसंख्या २३५ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. लखनऊकडून गोलंदाजीत नवीन उल हकने ३ तर रवी बिश्नोई, युधवीर सिंग चरक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली.कोलकाता नाईट रायडर्सने लखनऊच्या घरच्या मैदानावर एलएसजी संघाचा ९८ धावांनी मोठा पराभव केला. केकेआरने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १५० धावाही करू शकला नाही. लखनऊची फलंदाजी बाजू फेल ठरल्याने संघ १३७ धावांवरच ऑल आऊट झाला. संघाकडून सर्वाधिक ३६ धावांची खेळी मार्कस स्टॉयनिसने केली. त्याच्याव्यतिरिक्त इतर सर्व फलंदाज स्वस्तात बाद झाले. या विजयासह लखनऊ आयपीएल २०२४ च्या पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी पोहोचला आहे २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनऊ सुपर जायंट्स संघाची सुरुवात खराब झाली. ज्यात २० धावांवर त्यांनी पहिली विकेट अर्शिन कुलकर्णीच्या रूपाने गमवली, जो केवळ ९ धावा करून बाद झाला. यानंतर फलंदाजीला आलेल्या मार्कस स्टॉइनिसने केएल राहुलसह झपाट्याने धावा करायला सुरू केली. दोघांनी मिळून पहिल्या ६ षटकात संघाची धावसंख्या ५५ धावांपर्यंत नेली. ७० धावांवर लखनऊला दुसरा धक्का कर्णधार राहुलच्या (२२) रूपाने बसला. यानंतर संघाने लागोपाठ विकेट गमावल्या. लखनऊने ६ बाद १०९ धावा केल्या. लखनौचा डाव १३७ धावांवर आटोपून केकेआरने केवळ ९८ धावांनी सामना जिंकला नाही तर प्लेऑफमधील आपले स्थान जवळपास निश्चित केले. केकेआरकडून हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी ३ विकेट घेतले, आंद्रे रसेलने २ विकेट तर मिचेल स्टार्क आणि सुनील नरेन यांनी १-१ विकेट घेण्यात यश मिळवले. कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद २३५ धावा केल्या.

### नारायणची 81 धावांच्या खेळी

सलामीवीर सुनील नारायणच्या ८१ धावांच्या खेळीवर मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अवघ्या ३९ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ८१ धावांची शानदार खेळी खेळली. याशिवाय केकेआरसाठी अंगक्रिश रघुवंशीने ३२ धावा केल्या तर शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या रमणदीप सिंगने केवळ ६ चेंडूंचा सामना करत २५ धावांची नाबाद धारदार खेळी खेळून संघाची धावसंख्या २३५ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. लखनऊकडून गोलंदाजीत नवीन उल हकने ३ तर रवी बिश्नोई, युधवीर सिंग चरक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली. गोलंदाजीत नवीन उल हकने ३ तर रवी बिश्नोई, युधवीर सिंग चरक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली.

# एमएस धोनीची ऐतिहासिक कामगिरी

## महेंद्रसिंग धोनी आयपीएलचे सर्व हंगाम खेळणारा खेळाडू

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चेन्नई सुपर किंग्सचा थाला महेंद्रसिंग धोनी आयपीएलचे सर्व हंगाम खेळणारा खेळाडू आहे. चेन्नईकडून खेळताना धोनीच्या नावे अनेक मोठमोठ्या विक्रमांची नोंद आहे. फलंदाज, विकेटकिपर आणि चेन्नईचा खेळाडू म्हणून धोनीने कायमचं सर्वांना प्रभावित केले आहे. आता पंजाबविरूद्धच्या सामन्यातही धोनीने क्षेत्ररक्षण करताना ऐतिहासिक कामगिरी आपल्या नावे केला आहे.**



पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात महेंद्रसिंग धोनी ९व्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. मात्र हर्षल पटेलच्या चेंडूवर तो गोल्डन डक बाद झाला. तुफान फॉर्मात असलेला धोनी या सामन्यात मात्र बॅटने फेल ठरला. त्यानंतर क्षेत्ररक्षण करताना सिमरजीत सिंगच्या चेंडूवर धोनीने जितेश शर्माचाअप्रतिम झेल टिपला. यासह धोनी आयपीएलच्या इतिहासात १५० झेल घेणारा एकमेव खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी आयपीएलमध्ये कोणत्याही खेळाडूला १५० झेल घेता आले नव्हते.धोनीने आयपीएलमध्ये यष्टिरक्षक म्हणून १४६ आणि क्षेत्ररक्षक म्हणून ४ झेल घेतले आहेत. या यादीत दिनेश कार्तिक दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने १४४ झेल घेतले आहेत, त्यापैकी १३६ झेल त्याने यष्टिरक्षक म्हणून आणि ८ झेल क्षेत्ररक्षक म्हणून घेतले आहेत.यष्टीच्या मागे धोनी एक उत्कृष्ट यष्टीरक्षक तर आहेच. पण धोनी एक उत्तम फिनिशर आहे. धोनीने आतापर्यंत २६१ सामन्यांमध्ये ५१९२ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये २४ अर्धशतकांचा समावेश आहे.चेन्नई सुपर किंग्सच्या गोलंदाजांच्या जोरावर आणि रवींद्र जडेजाच्या शानदार अष्टपैलू खेळीच्या जोरावर सीएसकेने पंजाबवर विजय मिळवला. या विजयासह चेन्नईने प्लेऑफच्या शर्यतीत आपले स्थान अधिक पक्के केले आहे. या विजयासह चेन्नईने काही दिवसांपूर्वी पंजाबने केलेल्या पराभवाचा बदला घेतला.

### सामना जिंकल्याचा खूप आनंद

यामध्ये जडेजाच्या ४३ धावा आणि ३ विकेट्सने मोठी भूमिका बजावली. पण या सामन्यापूर्वी सीएसकेचे काही खेळाडू आजारी होते, त्यामुळे सामन्यात कोण खेळणार हेही सकाळपर्यंत नक्की नव्हतं, याबाबत ऋतुराजने वक्तव्य केले आहे.विजयानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड म्हणाला, “सर्वांना वाटले की विकेट स्लो आहे त्याला जास्त संधी मिळाल्या नाहीत, पण उशीरा का होईना त्याला संधी मिळाली. आम्ही फलंदाजाला इम्पॅक्ट खेळाडू म्हणून घेण्याचा विचार करत होतो, पण नंतर आम्हाला वाटले की फलंदाज १०-१५ धावा देईल, पण तो २-३ विकेट घेऊ शकतो. काही खेळाडू फ्लू झाला होता. त्यामुळे सकाळपर्यंत कोण खेळणार आणि कोण नाही हेही नक्की नव्हतं. पण सामना जिंकल्याचा खूप आनंद आहे.”